I/2597279/2026

ZPAHM-15013(11)/37/2026-FIN

श्री.जिवन उत्तमसिंग राजपुत,कनिष्ठ लेखाधिकारी गट-क,
पंचायत समिती कोपरगाव, जि.प.अहिल्यानगर यांना कनिष्ठ
लेखाधिकारी या पदावरुन नविन नियुक्तीच्या पदावर
हजर होणेसाठी कार्यमुक्त करणेबाबत...

जिल्हा परिषद अहिल्यानगर
अर्थ विभाग
कार्यमुक्त ज्ञापन क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/२८७/२०२६
अहिल्यानगर दिनांक:- १० /०८/२०२६

**वाचा-** १. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय जा.क्र.एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.-३३/९२/८ दिनांक ०२ डिसेंबर १९९७

२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अ.नगर यांचेकडील नियुक्ती आदेश क्र. अर्थ/कार्या-१/आस्था-१/६१/२०२६ दिनांक १७/०२/२०२६

३. सह सचिव,नियोजन विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन आदेश क्रमांक:नामनि- १२२६/प्र.क्र.१२/का.१४२७ दिनांक २३ जुलै,२०२६

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव यांचेकडील पत्र जा.क्र साप्रवि/आस्था-१ / १५७३/२०२६ दिनांक २४/०७/२०२६ व सहपत्रातील श्री. राजपुत यांचा दिनांक २३/०७/२०२६ रोजीचा कार्यमुक्तीचा अर्ज.

ज्याअर्थी, श्री.जिवन उत्तमसिंग राजपुत,कनिष्ठ लेखाधिकारी, पंचायत समिती कोपरगाव, जि.प.अहिल्यानगर यांनी कनिष्ठ लेखाधिकारी या पदावरुन सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी या पदावर महाराष्ट्र लोकसेवा आरोगाव्दारे नियुक्ती झालेली आहे. त्यामुळे सदर पदावर रुजू होणेकामी कार्यमुक्त करणेबाबत संदर्भ क्रमांक ४ अन्वये श्री. राजपुत यांचा विनंती अर्ज या कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे.

ज्याअर्थी, श्री.जिवन उत्तमसिंग राजपुत,कनिष्ठ लेखाधिकारी, पंचायत समिती कोपरगाव हे इकडील संदर्भ क्रमांक २ मधील नियुक्ती आदेशा अन्वये कनिष्ठ लेखाधिकारी या पदावर दिनांक १७/०३/२०२६ रोजी पंचायत समिती कोपरगाव, जि.प.अहिल्यानगर येथे हजर झालेले आहेत. श्री. राजपुत,कनिष्ठ लेखाधिकारी, पं.स.कोपरगाव यांचा शासकीय सेवेतून कार्यमुक्त होणेबाबतच्या दिनांक २३/०७/२०२६ रोजीच्या अर्जानुसार महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.-३३/९२/८ दिनांक ०२ डिसेंबर १९९७ मधील परिच्छेद २ (ब) २ (एक) मधील तरतूदीनुसार त्यांनी केलेल्या विनंतीनुसार व सदर शासन निर्णयातील तरतूद क्रमांक २ (इ) नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, श्री.जिवन उत्तमसिंग राजपुत,कनिष्ठ लेखाधिकारी, पंचायत समिती कोपरगाव, जि.प.अहिल्यानगर यांना त्यांचे नविन नियुक्तीच्या पदावर हजर होणेसाठी त्यांचा तांत्रिक /औपचारिक बाब म्हणून राजीनामा स्वीकृत करण्यात येत आहे.

तरी सदर आदेशयान्वये श्री.जिवन उत्तमसिंग राजपुत,कनिष्ठ लेखाधिकारी, पंचायत समिती कोपरगाव यांना त्यांचे नविन नियुक्तीच्या पदावर हजर होणेसाठी या जि. प. सेवेतून दिनांक ११ /०८/२०२६ रोजी मध्यान्यपूर्व/~~मध्यान्यनंत~~र कार्यमुक्त करण्यात येत आहे.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०८१००५००२४ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 10-08-2026 16:15:03

आनंद भंडारी (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

प्रति,

श्री.जिवन उत्तमसिंग राजपुत,कनिष्ठ लेखाधिकारी, पंचायत समिती कोपरगाव, जि.प.अहिल्यानगर
व्दारा व प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

२/- संबंधितास वरीलप्रमाणे जि. प. सेवेतून कार्यमुक्त करणेत आलेले आहे. त्यानुसार त्यांच्याकडे असलेल्या पदभारबाबत आपले स्तरावरून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

प्रत- सहसचिव,नियोजन विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय मुंबई-४०००३२

प्रत- जिल्हा नियोजन समिती,जिल्हाधिकारी कार्यालय,बीड-४३११२२